# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** चामोर्शी **Year (वर्ष):** 2022
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0098 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 11/04/2022 14:53 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
      **Time Period (कालावधी):**
      **Date From (दिनांक पासून):** 10/04/2022
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/04/2022
      **Time From (वेळेपासून):** 17:41 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 10:44 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 11/04/2022 **Time (वेळ):** 14:53 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
   **Entry No. (नोंद क्र.):** 028 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 11/04/2022 14:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 01 किमी
   **Beat No. (बिट क्र.):**

   (b) **Address (पत्ता):** चामोर्शीयेथेगैरअर्जदारराहतेघरी,चामोर्शी, 442603

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**
   (a) **Name (नाव):** श्री जिवनदास तमाजी हजारे
   (b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
   (c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1998 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
   (e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
   (f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
   **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घारगाव,चामोर्शी,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |
| 2 | स्थायी पता | घारगाव,चामोर्शी,चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,442603,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | नामदेव हरिभाऊ चंदनखेडे | | | 1. ह मु हनुमान वार्ड चामोर्शी,चामोर्शी, चामोर्शी,गडचिरोली,महाराष्ट्र,भारत-442603 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

आज रोजी लेखी फिर्याद प्राप्त होताच

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | रू. 500/ दराच्या 4 चलनी नोटा | 2,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 2,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

नक्कल फिर्याद दिनांक 11/04/2022नांव:-श्री जिवनदास तमाजी हजारे, वय 24 वर्षे, जात-कुणबी (ओबीसी), धंदा-शेती, मु. घारगांव, ता. चामोर्शी जि. गडचिरोली. मो.नं. 9284064260.मी दिनांक 10/04/2022 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, गडचिरोली यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार नोंदविली श्री. सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी माझे सांगण्याप्रमाणे माझी लेखी तक्रार नोंदवून त्यावर माझी सही घेतली. मी नोंदवलेली तक्रार खालीलप्रमाणे आहे. माझे वडील शेतकरी असुन माझे वडीलांनी माझे भाऊ नामे सुधीर हजारे याचे नावे मौजा घारगांव भुमापन क्रं. 65 मधील 0.03 हे.आर. व भुमापन क्रं. 68 मधील 0.27 हे.आर. अशी एकुण पाऊण एकर (0.30 हे.आर.) शेती खरेदी करुन दिनांक 18.02.2022 रोजी रजिस्ट्री केली. माझा भाऊ नामे सुधीर हजारे याचे नावे खरेदी केलेल्या शेतजमीनीचा फेरफार करणे असल्याने मी दिनांक 23.02.2022 रोजी आमचे तलाठी कार्यालय दोडकुली येथे जावुन जमीनीचे फेरफार करण्याकरीता अर्ज सादर केला. त्यानंतर काही दिवसांनी मी तलाठी कार्यालयात जावुन विचारपुस केली. तेव्हा तलाठी श्री चंदनखेडे साहेब हे मला म्हणाले की, तुझ्या भावाचे नावे शेतजमीनीचा फेरफार करुन पाहीजे असल्यास मला रु. 5,000/- दयावे लागतील. असे बोलले.त्यानंतर माझे काम झाले नाही म्हणुन मी विचारणा करण्यास गेलो, तेव्हा त्यांना 3000/- रु. दिले. दिनांक 09.04.2022 रोजी आमचे गावचे श्री. कबीर आभारे यांनी,तलाठी साहेबांनी फेरफार करीता 2000/- रु. मागितले आहे, असे सांगितले. त्यामुळे मी तलाठी श्री. चंदनखेडे साहेब यांना भेटण्यास तलाठी कार्यालयात गेलो असता त्यांनी मला, तुमचे फेरफार करण्यासाठी 2000/- रू. दयावे लागतील, असे म्हणाले. तेव्हा त्यांना विनंती केली की, साहेब मी गरीब माणुस आहे, एवढे पैसे जास्त होते. त्यावर श्री चंदनखेडे, तलाठी मला म्हणाले की, रु. 2,000/- दिल्या शिवाय फेरफारचे काम होणार नाही. असे म्हणाले. माझे भावाच्या नावे जमीनीचे फेरफार होणार नाही. या भीतीपोटी ठिक आहे साहेब मी पैशाची व्यवस्था करतो व आपणास येवून भेटतो. असे म्हणालो असता त्यांनी ठिक आहे तु चामोर्शीला घरीच ये, म्हणुन मला पैशाची मागणी केली आहे. श्री. चंदनखेडे, तलाठी, दोडकुली, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली यांचेशी माझा कोणताही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण घेवाण अथवा भांडण नाही. मी सोबत आणलेले रु. 2,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत. श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी 2 शासकिय पंचांना पाचारण करून त्यांची व माझी एकमेकांना ओळख करून दिली. दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझा लेखी तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला. सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. सापळा अधिकारी यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांनी व्हईस रेकऑर्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हईस रेकर्डरद्वारे रेकर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू.2,000/- (रू. 500/- दराच्या 4 चलनी नोटा) घेतले. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. सदरच्या नोटांना अँथ्रसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म व प्रात्यक्षीक करून दाखवुन लाचेच्या रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री गरड, पोलीस उप अधीक्षक यांनी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत. दिनांक 10/04/2022 रोजी श्री सुरेंद्र गरड, पोलीस उप अधीक्षक, मी, शासकीय पंच व स्टफ सह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय गडचिरोली येथुन शासकिय वाहनाने रवाना होवुन मौजा चामोर्शी येथील सा.बा. विभागाचे विश्रामगृह येथे पोहचलो. सापळा अधिकारी यांनी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याप्रमाणे व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री चंदनखेडे तलाठी यांचे राहते घरी जाण्यास रवाना केले. मी चंदनखेडे तलाठी यांचे घरी त्यांना भेटण्यास गेलो. तेव्हा त्यांची घरीच भेट झाली व त्यांनी मला भावाचे नावे जमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरीता रू. 2000/- दयावे लागतील, तेव्हा साहेब माझ्या जवळ ऐवढे पैसे नाहीत मी पैसे जमवुन उदया किंवा परवा येवुन भेटतो असे म्हणालो. त्यावर त्यांनी ठिक आहे चामोर्शीला घरीच ये, म्हणुन मला पैशाची मागणी करून रू. 2,000/- लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली आहे. त्यानंतर मी पंच क्रं. 1 सह पोलीस उपअधिक्षक श्री सुरेंद्र गरड यांचेकडे परत गेलो असता, पंच क्रं. 1 यांच्या आवाजानंतर व्हईस रेकर्डर बंद करण्यात आला. पोलीस उप अधिक्षक श्री गरड यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हईस रेकर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण लोकसेवक श्री चंदनखेडे, तलाठी यांनी मला माझे भावाच्या नावे खरेदी केलेल्या भुमापन क्रं. 65 व 68 चे शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरिता उर्वरीत रू.2000/- ची परत मागणी करून लाच रक्कम उदईक रोजी स्विकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. त्यावरून लोकसेवक श्री चंदनखेडे, तलाठी यांचेविरूद्ध पुढील सापळा कार्यवाही करण्याचे ठरविण्यात आले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.आज दि. 11/04/2022 रोजी मला पंचासमक्ष अँथ्रसिन पावडर लावलेल्या नोटांचा सिलबंद लिफापा फोडून रू. 2,000/- लाचेची रक्कम माझे लोअर पंटच्या उजव्या खिशात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन लोकसेवक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर दुपट्टा डोक्याला बांधावा असा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. सापळा अधिकारी यांनी व्हईस रेकर्डर सुरू करून व्हईस रेकर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हईस रेकर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्री. चंदनखेडे, तलाठी यांचे मौजा चामोर्शी येथील राहते घरी लाच रक्कम देण्याकरीता रवाना केले. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य गटा-गटाने माझे मागोमाग आले. मी व पंच क्रं. 1 सह श्री. चंदनखेडे, तलाठी यांचे घरी गेलो असता, ते घरी हजर मिळुन आले. त्यानंतर मी अँथ्रसिन पावडर लावलेले रू.2,000/- लाचेची रक्कम त्यांना दिले असता, त्यांनी लाच रक्कम रू.2,000/- आपल्या उजव्या हाताने घेवुन दोन्ही हातांनी मोजत होते. त्याचवेळी मी दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे डोक्याला दुपट्टा बांधुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री चंदनखेडे, तलाठी यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक सुरेंद्र गरड यांनी पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत. तरी लोकसेवक श्री नामदेव हरिभाऊ चंदनखेडे, धंदा नौकरी, तलाठी, सांजा.क्रं.12, दोटकुली ता. चामोर्शी जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मला माझे भावाच्या नावे खरेदी केलेल्या भुमापन क्रं. 65 व 68 चे शेतजमीनीचे फेरफार करण्याचे कामाकरिता उर्वरीत रू. 2000/- ची परत मागणी करुन रू. 2,000/- लाच रक्कम माझेकडुन पंचासमक्ष स्विकारले. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे. समक्ष- मपोउपनि पल्लवी वाघ पोस्टे चामोर्शी फिर्यादीची सही.

**13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** surendra jagannath garad

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

S. MAJARE

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): bipin popatrao shewale

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): dgpbpsm7502

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**:**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**